महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 16 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 288 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीला विलंब का?

## जिल्हा उपनिबधकांचा चालढकलपणा कशासाठी?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. 10 मार्च 2025ला प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीतील प्राप्त हरकतीची दखल घेऊन त्यानंतर 25 मार्च, 2025 ला अंतिम यादी प्रसिद्ध करणे गरजेचे होते. मात्र 15 एप्रिल2025 तारीख उलटली तरी देखील जिल्हा उपनिबंधकांनी अंतिम यादी प्रसिद्ध केली नाही.

लोकशाही राज्य व्यवस्थेत ही बाब गंभीर असून याबाबत जिल्हा उपनिबंधक चालढकलपणा करत असल्याचा आरोप कल्याण व्यापारी संघटनेचे अध्यक्ष गणेश पोखरकर यांनी केला आहे.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची मुदत गत वर्षी एप्रिल, 2024 मध्ये संपुष्टात आलेली आहे. मात्र वारंवार मुदतवाढ देत या बाजार समितीची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. सध्याच्या संचालक मंडळाची मुदत 22 एप्रिल 2025 ला सपुष्टात येत आहे.

1 दरम्यान, बाजार समितीची निवडणूक वेळेत व्हावी अशी व्यापारी, शेतकरी व हमाल व मापाडींची मागणी आहे. याबाबत जिल्हा उपनिबंधक डॉ. किशोर मांडे यांच्याशी संपर्क साधला असता लवकरच अंतिम याद्या प्रसिद्ध करू; असे सांगत वेळ मारून नेली.

2 बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रियेला विलंब करण्याच्या डॉ. मांडे यांच्या धोरणाविरोधात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भरत भाऊ गोंधळे उपमुख्यमंत्री अजित दादांकडे तक्रार करणार आहेत.




## थोडक्यात महत्वाचे

### खडवलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव साजरा

**खडवली :** डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी व नालंदा बहुउदेशीय सेवाभावी संस्था खडवली यांच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंती महोत्सव कायैक्रमाचे आयोजन संत तुकाराम महाराज चौक खडवली पश्चिम येथे साजरा करण्यात आला,माजी सरपंच व जयंती महोत्सव कमिटीचे अधयक्षा वंदना सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली जयंती महोत्सव साजरा करण्यात आला,प्रथम उपस्थित पाहुणे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्या नंतर बौध्दचायै विनोद पवार यांनी बुद्ध वंदना कायैक्रम घेतला, उपस्थित पाहुणे याचा सन्मान करण्यात आला,यावेळी कायैक्रमाला टिटवाळा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम,ग्रॉंमपंचायतीच्या माजी सरपंच दिपाली शेलार, अजय सावंत,मंगेश शेलार,माजी सदस्य कवी भालके, सुभाष गंधे, व्याख्याते संजय चौधरी, बाळा शेख,उपप्राचार्य प्रशांत तांदळे,संजय पाटोळे,मनिष अगनिहोत्री,संजय जाधव, किरण सुयैवंशी, व्यकटेंश कांबळे, तसेच जयंती महोत्सव कमिटीचे उपाध्यक्ष सुनील भोईर, निशांत रातांबे,निलेश गायकवाड, विकी जाधव, प्रथमेश जावडेकर, संदिप जाधव, अजय चव्हाण, प्रतिक चव्हाण, दिपक सोनावणे, संजय सोनावणे, महेंद्र ननावरे,,यांच्या सह खडवली परिसरातील बहुजन बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या,यावेळी संध्याकाळी भव्य मिरवणूक कोळीवाडा टेप येथून मिरवणुकीचे आयोजन केले होते, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरुण पाटील, सरपंच प्रियांका राऊत, नडगावचे माजी उपसरपंच शेखर लोणे यांच्या हस्ते महामानवांचे पुजन करून मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली, सविधन चौक येथे समारोप करण्यात आली,मिरवणुकीत मोठ्या संख्येने खडवली परिसरातील बांधव सहभागी झाले होते.

### रस्त्याच्या संथगती कामांमुळे उल्हासनगरात वाहतूक कोंडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. १५ :** रेल्वेस्थानकाच्या पूर्वेला असणाऱ्या वीर सावरकर मार्ग ते लालचक्की चौक या सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचे काम जवळपास पाच महिन्यांपासून कासवगतीने सुरू आहे. त्यामुळे दुसऱ्या रस्त्यावर वाहतुकीचा ताण आला असून, सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. कामाची निविदा ही तीन कंत्राटदारांना देण्यात आलेली आहे; मात्र कामे कासवगतीने सुरू आहेत. या मार्गावरून लालचक्की, संभाजी चौक, भाटिया चौक, कुर्ला कुर्ला कॅम्प, व्हीनस चौक, मोर्या नगरी, नेताजी चौक, मठमंदिर, दुधनाका, जुने बसस्थानक, कैलास कॉलनी या भागात रिक्षा धावतात; मात्र हा मार्ग जवळपास पाच महिन्यांपासून काम पूर्ण होण्याच्या प्रतीक्षेत आहे. या मार्गावरील वाहतूक ही अंबिका मंदिर, छत्रपती शाहू महाराज उड्डाणपूल, लालचक्की मार्गे वळवण्यात येत आहे. त्यामुळे अनेकदा वाहतूक कोंडी होते.

वीर सावरकर मार्ग ते लालचक्की चौका पर्यंत हा रस्ता आहे, परंतु सदर रस्ता हा दिव्या नोव्हेलटीपर्यंतच हा रस्ता बनला आहे. पूनम ज्वेलर्ससमोर अजूनही नाल्याचे काम अद्याप सुरू केलेले नाही. आझाद मित्र मंडळ, शंकर मंदिरसमोरील काम अद्याप सुरू केलेले नाही. गायत्री फरसाण, बजरंग बुक डेपो ते वीर सावरकर पुतळा येथील रस्त्याचे काम अजूनही सुरू केलेले नाही. शर्मा डॉक्टर समोरील नाल्याचे काम बंद अवस्थेत आहे. त्यामुळे ज्यांनी भाड्यावर दुकाने घेतलेली आहेत, त्यांच्यावर उपासमारीची व भाडे देता येत नाही, अशी खंत मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप गोडसे यांनी व्यक्त केली आहे.

# चिखलोली-अंबरनाथ येथे दिवाणी न्यायालय

## मंत्रीमंडळ बैठकीत महत्त्वाचे सात निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची आज मुंबई येथे महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्रिमंडळातील इतर सदस्यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने गृह, महसूल, नगरविकास, विधी व न्याय विभागांना झुकतं माप मिळालं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडील नगरविकास विभागांतर्गत सर्वाधिक तीन निर्णय घेण्यात आले आहेत.तसेच मुख्यमंत्र्यांच्या गृह विभागांतर्गत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानुसार कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणास या बैठकीवेळी मंजूरी देण्यात आली आहे. त्याचसोबत लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



**विधि व न्याय विभाग**

चिखलोली-अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करणार व त्याअनुषंगाने पदे मंजूर

**गृह विभाग**

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानुसार कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणास मंजूरी.

**नगरविकास विभाग**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा. नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करावरील दंड अंशतः माफ करून कर वसूलीसाठी व्हावी यासाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय

**नगरविकास विभाग**

नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमताने हटवण्याच्या तरतुदींस मान्यता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करणार.

**महसूल व वन विभाग**

भूमिसंपादन, पुनर्वसन पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 चे कलम-30(3), 72 व 80 मध्ये भूसंपादनाचा मोबदला विलंबाने अदा करताना आकारण्यात येणाऱ्या व्याजदरांच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय


**नगरविकास विभाग**

नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरीतील स्थावर मालमत्तांच्या हस्तांतरणांसाठीच्या नियमांमध्ये बदलास मान्यता


# आ. किसन कथोरेंच्या मागणीला यश

कुळगाव बदलापूर नगरपरिषद व मुरबाड नगरपंचायत हद्दीतील नागरिकांच्या थकीत मालमत्ता करावरील व्याज, दंड व शास्ती कमी करण्यासाठी अभय योजना लागू करण्याकरिता आमदार किसन कथोरे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे आणि राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन मागणी केली होती, त्या मागणीला आणि सततच्या पाठपुराव्याला अखेर आज यश मिळाले.




किसन शंकर कथोरे
आमदार, १३१ मुरबाड विधानसभा क्षेत्र जि. ठाणे
दिनांक : २५/०५/२०२४
जा. पत्र क्र.: के.एस.के./एम.एल.ए. - ५४३/२०२४
प्रति,
मा.ना.श्री.एकनाथ शिंदे साहेब,
मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री,
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई.
विषय :- नगरपरिषद व नगरपंचायतीमधील थकित मालमत्ता कर वसुली होण्यासाठी अभय / प्रोत्साहन योजना लागू करणेबाबत...
महोदय,
उपरोक्त विषयान्वये राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील थकित मालमत्ता कर वसुलीबाबत शासनाच्या नगरविकास विभागाने अभय योजना लागू करून मालमत्ता धारकांना दिलासा देवुन मालमत्ता कर वसुली करून महसुल जमा होण्यावावत प्रोत्साहन दिले जाते परंतु राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीमधील थकित मालमत्ता धारकांना शासनाच्या नगरविकास विभागाने उदासीनता दाखविली असुन त्यामुळे नगरपरिषद व नगरपंचायतीमधील नागरिकांवर अन्याय होत असल्याची भावना आहे.
त्याकरिता आपल्या नागरविकास विभागाच्या माध्यमातुन राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीमधील नागरिकांना थकित मालमत्ता करावरील लावण्यात आलेले व्याज,दंड व शास्ती माफ करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेवुन अभय योजना/प्रोत्साहन योजना लागू करुन नगरपरिषद व नगरपंचायतीमधील नागरिकांना दिलासा देण्यात यावा,ही विनंती.
कळावे,
आपला स्नेहांकित,
(आ.किसन कथोरे)
Email : kathoremlaoffice@rediffmail.com
kisankathore · mlkisankathore · mla_kisankathore

आज दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचयाती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करावरील दंड अंशतः माफ करून कर वसुली व्हावी याकरिता अभय योजना लागू करण्यात आली. त्याबद्दल आमदार किसन कथोरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे तसेच मा. अजित दादा पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत!




# ठाणे जिल्ह्यात ठाकरे गटाला घरघर; भाजपत इनकमिंग सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात महायुतीतील शिवसेना-भाजप या मित्रपक्षांमध्ये सध्या जोरदार इन्कमिंग सुरू आहे. निवडणुकीतील उमेदवारीच्या अपेक्षेने माजी लोकप्रतिनिधी आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्तेही महायुतीच्या मित्रपक्षांमध्येच दाखल होत असून गेल्या महिनाभरात शिवसेनेतून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या शिवसैनिकांचा आकडा लक्षणीय आहे. तर ठाकरे गटातूनही शिंदेसेनेत येणाऱ्या पदाधिकाऱ्यांमध्ये चढाओढ सुरु आहे. हे पक्षप्रवेश सुरू असताना ठाण्यात ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्याही वाढत असल्याने पक्षाला चांगलीच घरघर लागली आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर आता राजकीय नेत्यांना पालिका निवडणुकांचे वेध लागले आहेत. महायुतीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेना - भाजपमध्ये ठाण्यात काही दिवसांपासून महापौरपद, जनता दरबार, जनसंवाद, आमदार आपल्या भेटीला अशा उपक्रमांमधून शह - काटशहाचे राजकारण सुरु आहे. तर दुसरीकडे दोन्ही पक्षांत इतर राजकीय पक्ष, संघटना, सामाजिक संस्थांमधून पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात होत आहेत. यामध्ये केंद्र आणि राज्य पातळीवर सत्तेत 'मोठा भाऊ' असलेल्या भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा ओढा अधिक आहे. ठाणे महापालिकेत शिवसेनेचे माजी नगरसेवक असलेले लॉरेन्स डिसोझा यांनी रविवारी भाजपचा झेंडा खांद्यावर घेतला. तर याआधीही शिवसेनेतील फुटीनंतर ठाकरे गटात परतलेल्या पक्षाच्या माजी नगरसेविका रागिणी बैरीशेट्टी यांच्यासह ठाकरे गटाचे ओवळा - माजिवडा विधानसभा क्षेत्राचे उपशहरप्रमुख भास्कर बैरीशेट्टी, युवासेना चिटणीस सागर बैरीशेट्टी यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपची वाट धरली होती. दहा दिवसांपूर्वी शिवसेनेच्या ज्येष्ठ माजी नगरसेविका छाया राव आणि त्यांचे पुत्र मधुर राव यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. राव यांनी शिवसेनेनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसची वाट धरली होती. मात्र आता त्यांनी सत्ताधारी भाजपला पसंती दिली. तसेच ठाकरे गटाचे वागळे इस्टेट येथील उपविभागप्रमुख रामेश्वर बचाटे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी शिवसेना ठाकरे गटाच्या शिव आरोग्य सेनेचे जिल्हा संघटक अखिलेश पाल यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. त्यामुळे शिवसैनिकांचा ओढा भाजपकडे असल्याचे स्पष्ट होत आहे.

# नागरी सुविधांसाठी भिवंडी मनपात क्युआर कोड प्रणाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाला शिस्त लावण्याचे प्रयत्न आयुक्त अनमोल सागर यांनी सुरू केले असून त्यापाठोपाठ आता त्यांनी नागरी सुविधांसाठी सामायिक क्युआर कोडची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून दिली आहे. यामुळे पालिकेच्या कर भरणा करणे, सेवा हमी कायद्यानुसार एखाद्या सेवेकरिता अर्ज करणे, तक्रार करणे आणि प्रलंबित तक्रारींचा आढावा घेणे, अशा सुविधा नागरिकांना घरबसल्या उपलब्ध होणार आहे.

अशी सुविधा देणारी ही राज्यातील पहिली महापालिका असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. भिवंडी निजामपूर शहर महापालिकेचा २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. हा अर्थसंकल्प सादर करताना आयुक्त अनमोल सागर यांनी पारदर्शक आणि गतीमान प्रशासन राबविण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्याची पुर्तता करण्यासाठी आयुक्त सागर यांनी पाऊले टाकण्यास सुरूवात केली असून त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी सामायीक क्युआर कोड सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. शंभर दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत 'सुकर जीवनमान' उपक्रमाद्वारे ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या क्युआर कोडचे स्टिकर मनपाच्या सर्वच कार्यालयाबाहेर चिकटवण्यात येणार आहेत.

# ठाणे जिल्हा परिषदेच्या विस्थापित कार्यालयांमुळे नागरिकांना मनस्ताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ग्रामीण भागाचा विकास गाडा हाकणारे कार्यालय म्हणून जिल्हा परिषदे कडे पाहिले जाते. मात्र ठाणे जिल्हा परिषदेची ठाणे बाजारपेठेतील मुख्यालयाची इमारत जीर्ण झाल्याने सहा वर्षांपूर्वी पाडण्यात आली. त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतरित झालेले विभाग निहाय कार्यालय अद्यापही एकच छताखाली आले नाहीत. तर या इमारतीचे पुनर्बांधणीचे काम सुरू असून येत्या दोन वर्षात हे बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित असल्याने सद्यस्थितीत विविध कार्यालय शहराच्या विविध भागातून चालविली जात आहेत.

यामुळे नागरिकांसह या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे ही या कार्यालयातून त्या कार्यालयात हेलपाटे होत आहेत.

ठाणे जिल्ह्याला शहरी भागासह मोठ्या प्रमाणात ग्रामीण भाग लाभला आहे. याच ग्रामीण भागाचा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विकास साधला जातो. ग्रामीण भागातील शेतकरी, महिला, बालके यांच्यासाठी विविध योजना राबविणे. पायाभूत सुविधांची उभारणी करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषदेच्या शाळा यांसारख्या अनेक माध्यमातून जिल्हा परिषद यंत्रणा ग्रामीण भागाचा विकास साधत असते. ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागाची व्याप्ती पाहता जिल्हा परिषद यंत्रणेचे महत्व यात अनन्य साधारण आहे. ठाणे रेल्वे स्थानक जवळील बाजारपेठ परिसरात जिल्हा परिषदेची जुनी इमारत होती.

> जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम येत्या दोन वर्षात पूर्ण होणार असून सर्व विभाग एकाच छताखाली येतील. यामुळे नागरिकांना सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होतील.
>
> - संदीप चव्हाण, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे

सध्या ठाणे शहरातील वागळे इस्टेट या परिसरात जिल्हा परिषदेची इमारत आहे. भाडेतत्त्वावर घेण्यात आलेल्या या इमारतीमध्ये आरोग्य विभाग, जलजीवन, पाणी पुरवठा, समग्र शिक्षा, प्राथमिक शिक्षण, महिला बाल कल्याण, पशु संवर्धन, पाट बंधारे, मनरेगा, सामान्य प्रशासन यांसारखे विविध विभाग आहेत. तर शहरातील बि.जे. हायस्कूल येथे माध्यमिक शिक्षण, स्वच्छता आणि कृषी विभाग यांचे कार्यालय आहे. शहरातील महापालिकेच्या पार्किंग प्लाझा येथे बांधकाम विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान यांसारखे महत्वाचे विभाग कार्यालय स्थलांतरित करण्यात आले आहे.

नागरिकांना जिल्हा परिषदेशी संबंधित कोणतेही कामे असल्यास शहरातील तीन ठिकाणी असलेल्या विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. तर विविध बैठकांसाठी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना देखील या कार्यालयातून त्या कार्यालयात जावे लागत आहे.




# गीतासार



### अध्याय ८

## अक्षरब्रह्मयोगः

अर्जुन उवाच किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम । अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ ८-१ ॥

अर्जुन म्हणाला, हे पुरुषोत्तम श्रीकृष्णा, ते ब्रह्म काय आहे? अध्यात्म काय आहे? कर्म काय आहे? अधिभूत शब्दाने काय सांगितले आहे? आणि अधिदैव कशाला म्हणतात? ॥ ८-१ ॥

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन । प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ ८-२ ॥

हे मधुसूदना (श्रीकृष्णा), येथे अधियज्ञ कोण आहे? आणि तो या शरीरात कसा आहे? तसेच अंतकाळी युक्त चित्ताचे पुरुष तुम्हाला कसे जाणतात? ॥ ८-२ ॥

श्रीभगवानुवाच अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते । भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसञ्ज्ञितः ॥ ८-३ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, परम अक्षर ब्रह्म आहे. आपले स्वरूप अर्थात जीवात्मा अध्यात्म नावाने सांगितला जातो. तसेच भूतांचे भाव उत्पन्न करणारा जो त्याग आहे, तो कर्म या नावाने संबोधला जातो. ॥ ८-३ ॥

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् । अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ८-४ ॥

उत्पत्ती-विनाश असलेले सर्व पदार्थ अधिभूत आहेत. हिरण्मय पुरुष अधिदैव आहे आणि हे देहधाऱ्यांमध्ये श्रेष्ठ अर्जुना, या शरीरात मी वासुदेवच अंतर्यामी रूपाने अधियज्ञ आहे. ॥ ८-४ ॥

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् । यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ८-५ ॥

जो पुरुष अंतकाळीही माझेच स्मरण करीत शरीराचा त्याग करून जातो, तो साक्षात माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो, यात मुळीच संशय नाही. ॥ ८-५ ॥

# संघटन चळवळीतील वटवृक्ष

# ग.दि.कुलथे काळाच्या पडद्याआड

## राजपत्रित अधिकारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी साश्रू नयनांनी भावना केल्या व्यक्त



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्यातील सर्व शासकीय राजपत्रित अधिकाऱ्यांची अधिकृत शिखर संघटना महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष, मुख्य मार्गदर्शक, सल्लागार श्री.गणपत दिनकर कुलथे, यांचे वयाच्या 87 व्या वर्षी वृद्धापकाळाने तसेच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांच्या नेरुळ येथील राहत्या घरी काल दि.14 एप्रिल रोजी रात्री 9.00 वाजता निधन झाले. आज त्यांच्या कुटुंबियांच्या तसेच शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संघटना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नेरूळ येथील शांतीधाम येथे श्री.कुलथे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कुलथे कुटुंबियांसमवेत विविध शासकीय विभागातील अधिकारी-कर्मचारी, विविध संलग्न संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विश्वास काटकर, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण, राजपत्रित अधिकारी महासंघाचे माजी अध्यक्ष रवींद्र धोंगडे, विद्यमान अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, दुर्गा मंचच्या अध्यक्षा डॉ.सोनाली कदम, माजी माहिती संचालक देवेंद्र भुजबळ आदींनी यावेळी स्वर्गीय श्री. कुलथे यांच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी उपस्थित सर्वांनी स्वर्गीय ग.दि.कुलथे यांचे संघटना चळवळीतील राहिलेले अपूर्ण कार्य त्याच तडफेने, प्रामाणिकपणाने पूर्ण करण्याचा संकल्प करून स्व. श्री.कुलथे यांना श्रद्धांजली वाहिली.

स्व.श्री.ग.दि.कुलथे यांचा अल्प परिचय :-

- •श्री.गणपत दिनकर कुलथे,
- •जन्म -1.3.1939 रोजी, पारनेर (अहमदनगर) येथील.
- •शिक्षण कमवा व शिका योजनेतून रयत शिक्षण संस्थेत सातारा येथे.
- •लिपिक म्हणून विक्रीकर विभागात सेवा सुरुवात केली आणि कर्मचारी संघटनेत ते स्थिरावले. कर्मचारी संघटनेत विविध पदावर काम करीत बृहन्मुंबई कर्मचारी संघटनेच्या सरचिटणीस पदी प्रभावीपणे कार्य केले.
- •अधिकारी पदावर पदोन्नत झाल्यानंतर विक्रीकर अधिकारी संघटनेत देखील महत्वाची पदे भूषविली.
- •विक्रीकर विभागात कार्यरत असतानाच 7 फेब्रुवारी 1986 रोजी महासंघाची स्थापना केली. सदर महासंघात प्रथम 7 विभागीय संघटना होत्या त्याच विस्तार होऊन 72 विभागीय संघटनांना सामावणारा अधिकारी महासंघ आज 39 वर्षांच्या वटवृक्षासारखा विस्तारला आहे.
- •अशा प्रकारे तब्बल 50 वर्षाहून अधिक काळ संघटन चळवळीत सहभागी राहिले आहेत. त्यातच 1996 साली सेवानिवृत्तीनंतर देखील तब्बल 29 वर्षे राजपत्रित अधिकारी महासंघाचे कार्य अगदी शेवटच्या क्षणापर्यंत करीत होते.
- •साहेबांच्या कार्यकाळात अधिकाऱ्यांच्या महत्वपूर्ण प्रश्नांची सोडवणूक झाली असून त्यात सर्व वेतन आयोगांची केंद्राप्रमाणे राज्यात अंमलबजावणी झाली. महागाई भत्ता आणि इतर लाभ मिळत राहिले, अधिकाऱ्यांच्या पाल्यांना देखील अनुकंपा तत्वावर भरतीचा लाभ आदी बरेच प्रश्न सुटले आहेत. त्यातच अधिकाऱ्यांच्या कल्याणार्थ उभारत असलेले बांद्रा पूर्व येथील कल्याणकेंद्र हा त्यांचा महत्वकांक्षी प्रकल्प आहे.
- •आता त्यांची स्वप्न पूर्ती करण्यासाठी अधिकारी परिवारास एकत्र येऊन प्रयत्न करावयाचे आहे. कल्याणकेंद्र इमारत उभारल्यास तीच खरी कै.ग.दि.कुलथे साहेबांना श्रद्धांजली ठरेल.

# विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन



जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांची आज जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या आधीच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली. या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात "मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो." त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात "ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळखयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा."



चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपुढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट ' द कीड' याचं ओपनिंग टायटल होतं " अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर." स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत. आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता प्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# लेखापाल कामकाजासाठी वनविभागातून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक सेवानिवृत्त लेखापालांनी अर्ज करावेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण कार्यालयात वनविभागातून सेवानिवृत्त झालेल्या अनुभवी लेखापालाची कामकाजासाठी आवश्यकता असून इच्छुक सेवानिवृत्त लेखापालांनी ही बातमी प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाचे आत त्यांचे अर्ज विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण, स्वप्नपूर्ती बंगला, होरायझन हॉलच्या मागे, मु.लक्ष्मीनगर, पो.वरसोली, ता. अलिबाग, जि.रायगड या कार्यालयात लेखी स्वरुपात समक्ष येवून सादर करावेत, असे आवाहन विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण कांचन पवार यांनी केले आहे.

महसूल व वन विभागाच्या दि.02 ऑगस्ट 2024 शासन निर्णयान्वये कांदळवन कक्ष मुंबई पुर्नरचना होवून (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा) कांदळवन विभाग दक्षिण कोकण विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण यांचे कार्यालयाचे मुख्यालय अलिबाग रायगड येथे आदेशित केले असून अलिबाग येथे स्थित आहे. विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण विभागांतर्गत वनपरिक्षेत्र रायगड, रत्नागिरी, मालवण (सिंधुदुर्ग) कांदळवन हे समाविष्ट आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

# महिलांना राजकारणात येण्यासाठी प्रोत्साहन द्या

## परिसंवादात मान्यवरांचा 'एकसूर'



**ॲड सुदर्शन साळवी यांचे मयुरपंखी महिला मंडळ तसेच पारसिक येथील जोशी कट्टाचे जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

**प्रा डॉ प्रदिप ढवळ : एका चांगल्या आणि महत्वाच्या विषयावर हा परिसंवाद आयोजित केल्याने समाधान व्यक्त केले.**

**नुसती कवी संमेलन वगैरे न करता समाजातील अन्य समस्यांकडे लक्ष वेधणारे विषय हाताळले पाहिजेत- बाळ कांदळकर**

**राजकारणातील महिलांना सुध्दा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते त्यातील एक म्हणजे चारीत्र्य हनन असेही प्रतिपादन परिसंवादात सांगितले गेले.**

**कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संध्या लगड , प्रा.मनिषा रजपूत , अजित महाडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राजकारण हे पुरुषप्रधान क्षेत्र ओळखले जाते, पण आता या क्षेत्रात महिलाही मोठ्या प्रमाणात सक्रिय आहेत. त्यामुळे राजकारणात महिलांचा सहभाग निश्चित असावा, त्यासाठी त्यांना राजकारणात येण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे, असा सूर मान्यवरांनी परिसंवाद व्यक्त लावला.

कोकण मराठी साहित्य परिषद ठाणे जिल्हा, शारदा एज्युकेशन ट्रस्ट आणि यशोगंगा एज्युकेशनल अँड सोशल कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी आनंद विश्व गुरुकुल लॉ कॉलेज येथे 'सद्यस्थितीत राजकारणात महिलांचा सहभाग' या विषयावर परिसंवादाचे आयोजन केले होते. या परिसंवादात माजी नगरसेविका प्रतिभा मढवी, नम्रता भोसले, सामाजिक कार्यकर्त्या जयश्री सोलंकी, रेणुका शिंदे सहभागी झाल्या होत्या. परिसंवादाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांनी भूषवले.

यावेळी बोलताना रेणुका शिंदे म्हणाल्या, राजकारणात आज संवादाची पातळी हरवलेली आहे. त्याचा दर्जा खालावला आहे. त्यासाठी राजकारणात महिलांचा व्यापक दृष्टीने सहभाग असावा. राजकारण म्हटले की, त्याबाबत चुकीच्या गोष्टी अनेकदा बोलण्यातून बिंबवण्यात येतात. तसे न करता राजकारण चांगले आहे असे बोलायला सुरुवात करा. महिलांना राजकारणात पुढे आणण्याचा प्रयत्न करा, असे स्पष्ट मत जयश्री सोलंकी यांनी व्यक्त केले. राजकारणात महिला असताना त्यांना कुटुंबीयांचे पाठबळ निश्चित हवे. या क्षेत्रात काम करताना वेळेचे बंधन नसते. त्यामुळे आपल्या मतदारांना अन्याय झाल्यावर महिला एकजूट हवी. सगळ्या राजकीय पक्षांची महिला आघाडी असते, मात्र एखाद्या महिलेवर अन्याय झाल्यावर जेव्हा एका राजकीय पक्षातील महिला आघाडी आंदोलन छेडतात त्यात अन्य राजकीय पक्षाच्या महिला आघाडी सहभागी होताना दिसत नाहीत, अशी खंत ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केली. अशावेळी राजकीय पक्ष हा भेद बाजूला ठेवून सगळ्या पक्षाच्या महिला आघाडीने एकत्रित आवाज उठवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

अत्याचाराचा सामना सक्षमपणे करण्याची ताकद मुलींमध्ये महाविद्यालयीन जीवनापासून आणली पाहिजे. त्यासाठी आज राजकारणात सक्रिय असलेल्या महिलांनी महाविद्यालयात जाऊन त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे, असे मत बागवे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात कोमसापचे कार्याध्यक्ष डॉ. प्रा. प्रदीप ढवळ, ठाणे जिल्हा अध्यक्ष बाळ कांदळकर यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक नितल वढावकर यांनी केले तर मुख्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा चव्हाण यांनी केले.

आपल्याला मत देऊन आपल्यावर जबाबदारी सोपवली आहे हे लक्षात घेऊन काम केले पाहिजे, असे मत माजी नगरसेविका नम्रता भोसले यांनी व्यक्त केले.

राजकरणात महिलांनी जरूर यावे, मात्र या क्षेत्रात काम करताना वेळोवेळी आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यावेळी पुरुष-महिला असा भेदभाव न खुल्या लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण

या परिसंवादात कोमसापच्या वतीने आयोजित केल्या गेलेल्या खुल्या लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक - रेखा नाबर, द्वितीय - मानसी जोशी, तृतीय क्रमांक - माधव अंकलगे यांना प्राप्त झाला. त्यांना मानचिन्हे, प्रशस्तीपत्रक, पुस्तकभेट, रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

करता काम करावे, आपली कार्यकुशलता दाखवावी, असे आवाहन त्यांनी केले. तर महिला राजकारणात येतील तेवढे त्यांचे प्रश्न हे समाजात अधिक मांडले जातील, असा विश्वास माजी नगरसेविका प्रतिभा मढवी यांनी व्यक्त केला.

# आरोग्य

## पुदिना खा तंदुरुस्त राहा

पुदिन्याची चटणी खाल्ल्याने पोट हलके राहते. गॅस, अपचन यासारख्या पोटाच्या तक्रारी कमी होतात. उन्हाळ्यात पचनक्रिया वारंवार बिघडते, त्यामुळे या दिवसात तुम्ही पुदिन्याची चटणी अवश्य खायला हवी.

पुदिना शरीराला थंड ठेवते. याशिवाय शरीराचे तापमान संतुलित करते. यामुळे उष्माघाताचा धोका कमी होतो.

पुदिना थंड असल्याने तुम्ही माऊथ फ्रेशनर म्हणून याचा वापर करू शकता. यामुळे तोंडाची दुर्गंधी दूर होईल आणि उन्हाळ्यात तुम्हाला फ्रेश वाटेल.

पुदिन्यातील एंटी-ऑक्सिडंट्स, विटॅमिन्स शरीराची रोगप्रतिकारकशक्ती मजबूत करण्यासाठी फायदेशीर असतात. त्यामुळे या दिवसात शरीराला विविध संक्रमणापासून दूर ठेवण्यासाठी पुदिन्याची चटणी अवश्य खा.

पुदिन्याची चटणी खाल्ल्याने चयापचयाची गती वाढते, ज्यामुळे वेट लॉस होण्यास मदत मिळते.

पुदिना थंड आणि एंटी-बॅक्टेरिअल गुणधर्मांनी परिपूर्ण असल्याने त्वचेसाठी फायदेशीर ठरतो. पुदिन्याच्या सेवनाने शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात, ज्यामुळे त्वचा स्वच्छ आणि चमकदार बनते.

उन्हाळ्यात तीव्र उन्हामुळे डोकेदुखी भरपूर प्रमाणात जाणवते. अशा वेळी तुम्ही जर डोकेदुखी कमी करण्यासाठी थंडगार असे पुदिन्याची पदार्थ खाल्लेत तर नक्कीच डोकेदुखी कमी होऊ शकते.

# सेंट्रल रेल्वे हॉस्पिटलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डॉक्टर महेंद्र गांगुर्डे CMS कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली सेंट्रल रेल्वे हॉस्पिटल कल्याण मध्ये दिनांक 15 एप्रिल 2025 रोजी ठीक सकाळी 10.30 मिनिटांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात जल्लोषात साजरी करण्यात आली आहे. सर्व डॉक्टर गन व पॅरामेडिकल स्टाफ व इतर आपले सर्व रेल्वे कामगार बंधू भगिनी आणि सेंटर रेल्वे मजूर संघाचे मोठे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सीएमएस सर आणि आमचे फार्मासिस्ट यांनी मोठे मोलाचे मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी मोलाचे कार्यभार सांभाळणारे लाडके असे आमचे सचिन आवारेप्रमुख सहकारी मित्र गण सचिन आवारे तसेच ऑफिस सुप्रीडन राजेश पोल साहेब, संजीव चव्हाण, रवी सोनवणे राजेश गावंडे , सर्वे सिक्युरिटी गार्ड वरील सर्व सहकाऱ्यांच्या मेहनतीने तसेच सहकार्याने,मार्गदर्शनाने व नियोजनाने हा कार्यक्रम पार पाडण्यात आला तसेच कल्याण रेल्वे हॉस्पिटलच्या असिस्टंट नर्सिंग ऑफिसर मॅडम सर्व मेट्रान स्टाफ यांचा सुद्धा मोठा मोलाचा सहभाग होता. बाहेरील स्टेजचे सुशोभीकरण चांगल्या उत्तम पद्धतीने करण्याचे श्रेय गायकवाड डेकोरेटर्स यांचे सुद्धा आभार मानले जाते.

# पेण येथे शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंतांचा व आदर्श व्यक्तिमत्वांचा सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सोबती संघटना व बापूसाहेब नेने फाउंडेशन पेण मार्फत ज्येष्ठ समाजसेविका शुभांगी नेने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी बापूसाहेब नेने फाउंडेशन आणि सोबती संघटनेमार्फत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या पाच शिक्षकांना व मान्यवरांना आदर्श व्यक्तीमत्व पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

यावर्षी सोबती मार्फत सामाजिक क्षेत्रात काम करणारे वडखळचे पोलिस निरीक्षक प्रसाद दशरथ पांढरे, कला क्षेत्रात काम करणारे राजेंद्रनाथ मारूती जोशी, क्रिडा क्षेत्रात काम करणारी उत्कृष्ट कबड्डीपटू ऋणाली प्रदिप मोकल शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे गुरुकुल शिक्षण संस्था वडखळ, वैद्यकिय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉ. सोनाली मनिष वनगे, तर बापूसाहेब नेने फाउंडेशन तर्फे आदर्श शिक्षक म्हणून सौ, मानसी मच्छिंद्र केदारे शाळा नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी, श्रीमती मनिषा अमृत दळवी(शाळा डोलवी) सौ. सरिता सुधाकर सावंत आश्रम शाळा सावरोली सुधागड किशोर पांडुरंग पाटील(शाळा अंबिवली) सौ. सिमा रूपेश पाटील (अंगणवाडी शाळा वडखळ) अदिंचा समावेश आहे. हा पुरस्कार सोहळा 14 एप्रिल 2025 रोजी प्रायव्हेट हायस्कूल येथे करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी राधीकाताई घोरपडे पुणे, ज्येष्ठ समाजसेवक बापूसाहेब नेने व ज्येष्ठ समाजसेविका शुभांगी नेने पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी कार्याध्यक्ष वसंतराव आठवले माजी प्राचार्य सतीश पोरे संस्थेचे उपकार्याध्यक्ष संजय कडू सामाजिक कार्येकर्ते राजू पिचिकाआदि मान्यवरांच्या उपस्थितीत सोबती संघटनेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, सचिव डॉ. ॲड. निता कदम, खजिनदार निलेश म्हात्रे धनश्री जोशी राजे मॅडम यांच्यासह पेण शहरातील मान्यवर उपस्थित होते.

# डॉ.कल्याणी जाधव हिचा सहकार मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील माल्हेड गावचे रहिवाशी तानाजी जाधव व सविता जाधव यांची कन्या कल्याणी हिने नेवासा येथील अटलबिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालयात बी. एच. एम. एस. पदवी मिळवत डॉक्टर होण्याचा मान मिळवला. नुकताच शिर्डी येथे झालेल्या दिक्षांत समारंभात कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते डॉ. कल्याणी व तिच्या आई वडीलांचा सन्मान करण्यात आला.

शिर्डी येथे झालेल्या दिक्षांत समारंभात डॉ. कल्याणी हिचा सत्कार झाल्याने तालुक्यातील अनेक मान्यवरांनी जाधव परिवाराचे अभिनंदन करुन डॉ. कल्याणीचे कौतुक केले.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# अन्यथा; शास्त्रीनगर रुग्णालयाला टाळे !

## मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना मनसेचा गंभीर इशारा




**पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात एका डॉक्टराने पुढील पाच दिवस म्हणजे 20 एप्रिल पर्यंत हजेरी रजिस्टरवर सह्या केल्याचे दिसल्यावर मनसेने जाब विचारला. आधीच डॉक्टरांची कमतरता त्यात कामावर हजर असल्याचे दाखविण्याकरता असे प्रकार सुरु असल्याचे मनसेने आरोप केला.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात करदात्या गोरगरीब रुग्णांना अत्यावश्यक सेवा मिळत नाही. शास्त्रीनगर रुग्णालय फक्त शोभेचे झाले असून जास्तकरून गंभीर रुग्णाला ठाणे किंवा मुंबईत पाठविले जाते. या रुग्णालयात विविध शाखेसाठी तज्ञ डॉक्टर नाहीत. रुग्णालयात गंभीर परिस्थितीत ठेका पद्धतीने डॉक्टर बोलाविले जातात. काहीवेळा त्यांचीही उणीव जाणवते. असे रुग्णालय काय कामाचे त्यापेक्षा शहरभर फलक लावून आमच्या रुग्णालयात डॉक्टर नाहीत असा प्रसार करा म्हणजे कोणीही गंभीर आजाराचा रुग्ण येणार नाही प्रथमच तो इतर रुग्णालयात जावून आपला जीव वाचवेल असा असा रोखठोक सवाल मनसेने मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी विचारून पुढे बदल झाला नाही तर रुग्णालयाला टाळे ठोकू असा गंभीर इशारा दिला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना कल्याण जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर आणि ठाणे जिल्हा संघटक तथा डोंबिवली शहर अध्यक्ष राहुल कामत यांच्या नेतृत्वाखाली पालिकेच्या डोंबिवली शास्त्रीनगर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना घेराव घालून रुग्णालयातील कारभाराविषयी जाब विचारला. येथील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश चौधरी यांच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवत हे रुग्णालय फक्त गर्भवती महिलांसाठीच आहे का असा प्रतिप्रश्न केला. कोणत्याही प्रकारच्या रूग्णांना योग्य सेवा मिळत नसल्याच्या असंख्य तक्रारी येत आहेत असे ठणकावून सांगितले.

शास्त्रीनगर हॉस्पिटलमध्ये कोणकोणत्या सेवा उपल्बध आहेत? उपलब्ध सेवांकरिता किती डॉक्टर नियुक्त आहेत? किती डॉक्टर कायमस्वरुपी सेवेत आहेत व किती डॉक्टर हे ऑनकॉल स्वरुपात आहेत? सुट्टीच्या दिवशी डॉक्टर उपलब्ध नसतात अशावेळी रुग्णालयाच्या माध्यमातून रुग्णांसाठी काय उपाययोजना केली जाते? गर्भवती महिला / नवजात बालके इतरत्र स्थलांतरीत करण्यामागचे कारण काय? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती पालिकेच्या मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांच्यासमोर ठेवली.

येथे रुग्णसुविधा कायमच अपुरी, गर्भवती महिलांना दुसऱ्या रुग्णालयात जाण्याचा सल्ला, रुग्णालयात औषध नसल्याचे सांगत रुग्णालयातील डॉक्टरांकडून समोरील मेडिकलमधून औषध घेण्यास सांगणे, रुग्णवाहिके करता पैसे घेणे असे प्रकार घडत असल्याचा आरोप मनसेने यावेळी केला.

रुग्णांना सुविधाच मिळत नसेल तर कशाला हे रुग्णालय सुरु ठेवता. रुग्णालयात फक्त दोन लिपीक ठेवा असे मनसे कल्याण जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर यांनी यावेळी सुनावले. रुग्णालय औषधे उपलब्ध असताना डॉक्टर्स समोरील दोन मेडिकल दुकानातील औषधे देत असल्याचा आरोप मनसेने केला. याबाबत मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी यावर रुग्णालय औषधे उपलब्ध आहेत. रुग्णांना उपचार मिळावे व रुग्ण लवकरात लवकर बरा व्हावा म्हणून डॉक्टर्स प्रयत्न करतात.

यावेळी मनसे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दीपिका पेडणेकर, कल्याण जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर, डोंबिवली शहर अध्यक्ष राहुल कामत, माजी नगरसेवक सुदेश चूडनाईक, माजी नगरसेविका कोमल पाटील, अरुण जाभंळे, संदीप ( रमा) म्हात्रे, प्रेम पाटील, सुमेधा थत्ते, नंदकुमार भोसले, राजू पाटील, श्रीकांत वारंगे, स्मिता भणगे, चेतन म्हात्रे, रितेश म्हात्रे, अश्विन ब्रम्हा पाटील आदी मनसे पदाधिकारी व मनसैनिक उपस्थित होते.

# कल्याण गायन समाज शताब्दी समिती अध्यक्षपदी सीताराम कुंटे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण गायन समाजाचे शताब्दी वर्ष जुलै २०२५ मध्ये सुरू होणार आहे. त्यानिमित्ताने शताब्दी समितीची पहिली सभा आज कल्याण गायन समाजाच्या सभागृहात संपन्न झाली. या समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सनदी अधिकारी(निवृत्त) माजी मुंबई महापालिका आयुक्त तसेच माजी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य सीताराम कुंटे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष म्हणून डोंबिवली मधील ज्येष्ठ सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यकर्ते तसेच टाटा टेली सर्विसेस लिमिटेडचे कायदेशीर सल्लागार माधवराव जोशी यांची नियुक्ती करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर संदीप जाधव यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. चिटणीस म्हणून प्रशांत दांडेकर, मोहित ताम्हनकर व निखिल बुधकर यांची तर खजिनदार म्हणून डॉ. मंदार परांजपे व राहुल रोडे यांची नियुक्ती झाली. सभेस समाजाचे कार्यकारिणी सदस्य, देवगंधर्व महोत्सवाचे माजी अध्यक्ष उपाध्यक्ष, शिक्षक वर्ग, तसेच अनेक तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

दिनांक 10 जुलै 2025 या दिवशी होणाऱ्या छोट्याशा धार्मिक अनुष्ठानाने शताब्दी वर्षाला सुरुवात होईल. या सभेत वर्षभर संगीत विषयाच्या कार्यशाळा, प्रात्यक्षिकासह गायन वादन, स्पर्धा, मासिक जलसे आयोजित करण्याचे ठरले. तसेच शताब्दी वर्षातील देवगंधर्व महोत्सव देखील असाच दिमाखदार पद्धतीने साजरा करायचे ठरले.

विशेष बाब म्हणजे कल्याण डोंबिवली महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त अभिनव गोयल हे देखील सभेस उपस्थित होते आणि महापालिकेतर्फे शक्य ते सहकार्य मदत देण्याचे त्यांनी सभेस आश्वासन दिले. कल्याण आणि डोंबिवली परिसरातील सर्व नागरिकांच्या दृष्टीने या सांगीतिक संस्थेचे शताब्दी वर्ष साजरे होणे ही अतिशय अभिमानाची बाब आहे. सर्व नागरिकांनी या सांगीतिक सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# भिवंडी-वाडा- मनोर' महामार्गाच्या कामाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा** : अनेक वर्षांपासून बहुचर्चेत असलेला "भिवंडी- वाडा मनोर" हा ६४ किमी महामार्ग विद्यमान वनमंत्री तथा पालघर जिल्हा पालकमंत्री गणेश नाईक यांच्या निर्देशानंतर देखील सुस्थितीत होण्याचे व कामाची गती वाढतानाचे काही नाव घेताना दिसून येत नाही. या ज्वलंत प्रश्नाकडे शासन व प्रशासन स्तरावरून सातत्याने दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. "भिवंडी - वाडा - मनोर" महामार्गाच्या दुरवास्थेबाबत पालघर येथे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दोन्ही वेळीच्या (२० फेब्रुवारी व २८ मार्च) जनता दरबारात नागरिकांनी लक्ष वेधित हि समस्या सोडविण्यासाठी



निवेदन दिले आहेत. मात्र तरीही रस्त्याबाबत प्रशासन स्तरावरून कुठलीही ठोस कार्यवाही किंवा प्रगती होताना दिसुन येत नाही.

वाडा तालुक्यामध्ये औद्योगीकरण क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने हा "भिवंडी-" वाडा - मनोर" महामार्ग दळणवळणासाठी किती महत्त्वाचा आहे हे दिसते. या ६४ किलोमीटर महामार्गाचे नव्याने कॉंक्रिटीकरणासाठी 'ईगल कंन्स्ट्रक्शन" कंपनीला ७७६ कोटींचा कामाचा ठेका दिला आहे. कामाचा पहिला टप्पा ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत "भिवंडी- अंबाडी (रवदी) "१८ किलोमीटर पर्यंत तर दुसरा टप्पा वाडा तालुक्यातील "डाकीवली फाटा - वाडा" या २२ किलोमीटर करीता पालघर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली मागील पाच महिन्यांपासून अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी जागोजागी दीड ते दोन किलोमीटर अंतरावर खोदकाम केले आहे. काही ठिकाणी कुठलेही दिशादर्शक फलक किंवा सुरक्षितेच्या कुठल्याही उपायोजना केलेल्या दिसुन येत नाहीत.

# विदर्भाची लेक, 'ठोबंरे बाई' लंडनच्या रंगमंचावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्राच्या हास्याच्या परंपरेत एक ऐतिहासिक आणि मानाचा क्षण लवकरच येणार आहे. येत्या ९ मे रोजी, विदर्भातील नागपूरच्या नेहा ठोबंरे, ज्या सर्वत्र 'ठोबंरे बाई' म्हणून प्रसिद्ध आहेत, लंडनच्या प्रतिष्ठित रंगमंचावर आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांना लोटपोट करणार आहेत. महाराष्ट्रातील पहिली महिला विनोदी कलाकार म्हणून लंडनमध्ये सादर करण्याची ही संधी केवळ राज्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतीय कलाविश्वासाठी गौरवाची बाब आहे.

नेहा ठोबंरे यांनी आपल्या खास विदर्भीय शैलीतून आणि अस्सल विनोदी अंदाजाने महाराष्ट्रातील घराघरात ओळख निर्माण केली आहे. सामाजिक विषयांवरील त्यांचे मार्मिक आणि विनोदी भाष्य तसेच दैनंदिन जीवनातील गमती जमतींना खुमासदारपणे सादर करण्याची त्यांची हातोटी प्रेक्षकांना नेहमीच आकर्षित करते. 'ठोबंरे बाई' या नावाने त्या विशेष लोकप्रिय आहेत. आता त्यांची ही कला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणार असून, लंडनमधील मराठी तसेच इतर भाषिक प्रेक्षकांनाही भारतीय विनोदाची झलक अनुभवायला मिळणार आहे.

या ऐतिहासिक संधीबद्दल बोलताना नेहा ठोबंरे (ठोबंरे बाई) यांनी सांगितले की, "लंडनमध्ये परफॉर्म करणे हे माझे स्वप्न होते आणि ते आता साकार होत आहे याचा मला खूप आनंद आहे. माझ्या महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आणि नागपूरमधील प्रेक्षकांनी मला नेहमीच भरभरून प्रेम दिले आणि त्यांच्या याच पाठिंब्यामुळे मी आज हे यश मिळवू शकले आहे. लंडनच्या रंगमंचावर मी माझ्या महाराष्ट्राची आणि भारतीय विनोदाची पताका फडकवणार आहे. 'ठोबंरे बाई' म्हणून मला तिथेही तेवढेच प्रेम मिळेल अशी आशा आहे."

९ मे रोजी होणारा हा कार्यक्रम लंडनमधील एका प्रमुख नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून, लंडनमधील मराठी मंडळींमध्ये याबद्दल प्रचंड उत्सुकता आहे. अनेक संस्था आणि व्यक्ती या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सक्रियपणे सहभागी झाले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात नोंदली जाणारी ही घटना इतर महिला कलाकारांनाही प्रेरणा देणारी ठरेल यात शंका नाही.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# उत्तन-विरार सागरी सेतू साठी सुमारे पाच एकर कांदळवनावर कुऱ्हाड

## पर्यावरण मंजुरीसाठी एमएमआरडीएकडून प्रस्ताव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) उत्तन - विरार सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ५५ किमी लांबीच्या या प्रकल्पासाठीच्या ८७४२७.१७ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास नुकतीच एमएमआरडीए प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सागरी सेतूचा प्रस्ताव पर्यावरण मंजुरीसाठी सरकारकडे सादर करण्यात आला आहे. प्रस्तावानुसार या सागरी सेतूच्या कामादरम्यान उत्तन विरार पट्ट्यातील तब्बल ४.९४ एकर कांदळवण बाधित होणार आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

प्रकल्पात संरचनात्मक बदल

मुंबई महानगरपालिकेने वर्सोवा दहिसर दरम्यान २२ किमी लांबीचा सागरी किनारा मार्ग प्रकल्प हाती घेतला आहेत. त्यापुढे एमएमआरडीए उत्तन विरार सागरी सेतू बांधणार आहे. ५५ किमी लांबीचा सागरी सेतूचा प्रस्ताव नुकताच एमएमआरडीएने पर्यावरण परवानगीसाठी पाठवला आहे. समुद्रातून सागरी सेतू, तर किनारा मार्गावरून आंतरबदल मार्ग जाणार आहे, त्यामुळे बांधकामादरम्यान मोठ्या प्रमाणावर भराव टाकण्यात येणार असून कांदळवनावर कुऱ्हाड पडणार आहे.

पर्यावरणावर कमीत कमी परिणाम होईल याची काळजी घेत प्रकल्पाचे संरेखन करण्यात आल्याचे एमएमआरडीएकडून सांगितले जात असले तरी या प्रकल्पातही पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होणार असल्याचे उघडकीस येत आहे. एमएमआरडीएतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ५५ किमी लांबीच्या सागरी सेतू (तीन आंतरबदल मार्गिकांसह) प्रकल्पात तब्बल ३८ एकर कांदळवन बाधित होणार आहे. हे प्रमाण बरेच मोठे आहे. . त्यामुळे एमएमआरडीएने हे प्रमाण कसे कमी करता येईल याचा विचार केला आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या बांधकामात अनेक संरचनात्मक बदल करण्यात आल्याचे एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

उत्तन - विरार दरम्यान ५५ किमी लांबीच्या सागरी सेतूच्या रुंदीअंतर्गत एकूण ३८ एकर कांदळवन क्षेत्र बाधित होणार होते. मात्र हे क्षेत्र कमी करण्यासाठी ६० मीटर उंच स्पॅनचा वापर करत उन्नत पूल बांधण्यात येणार आहेत. तर उन्नत पुलाच्या पाईल कॅपवरही विशेष लक्ष देण्यात येणार आहे. जेणेकरून जागेचा कमीत कमी वापर होईल. त्यामुळे ३८ एकरऐवजी केवळ ४.९४ एकर कांदळवन क्षेत्र




बाधित होणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याचवेळी बाधित होणाऱ्या कांदळवनाचे नुकसान भरून काढण्यासाठी एमएमआरडीए १९० एकर क्षेत्रावर कांदळवन रोपण करणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

पर्यावरणप्रेमींनी मात्र याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. विकासाच्या नावावर पर्यावरणाचा ऱ्हास कधी थांबणार हा प्रश्नच आहे. कांदळवन पर्यावरणाचे संतुलन राखणारा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. सर्वाधिक कार्बन डायऑक्साईड शोषून घेत प्राणवायू देणारा हा घटक आहे. यातूनच त्याचे महत्त्व अधोरेखीत होते. त्याचवेळी कांदळवनामुळे जमिनीची धूप रोखली जाते, मत्स पालनास मदत होते, त्सुनामी, वादळात संरक्षण होते. असे असताना इतक्या मोठ्या संख्येने कांदळवन नष्ट करणे धोक्याचे आहे, असे प्रतिक्रिया 'वनशक्ति'चे प्रकल्प संचालक स्टॅलिन दयानंद यांनी सांगितले.

# नवी मुंबई महापालिकेत ९७ अधिकारी-कर्मचाऱ्यांना पदोन्नती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून '१०० दिवस कृती आराखडा हा उपक्रम राबवण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत नवी मुंबई महापालिकेने प्रशासकीय कार्यात गती देत अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षक कल्याणासाठी पावले उचलली आहेत.

यामध्ये स्वच्छतेपासून लोकाभिमुख कार्यप्रणाली राबवत, ऑनलाइन सेवासुविधांवर भर देण्यात आला आहे. तसेच आठ संवर्गातील ९१ अधिकारी-कर्मचाऱ्यांना पदोन्नती तसेच १८ संवर्गातील ८० अधिकारी, कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून नवी मुंबई महापालिकेच्यावतीने १०० दिवस कृती आराखडा उपक्रम राबवण्यात आला होता. नवी मुंबई पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, आणि अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. या कृती आराखड्यामध्ये नवी मुंबईतील नागरिकांसाठी विविध सोयीसुविधा राबवण्यात आल्या आहेत. त्यात जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणीसाठीची प्रक्रिया अद्ययावत करण्याचे आदेश आयुक्तांकडून देण्यात आले होते. त्याचप्रकारे आता या आराखड्यात प्रशासन आणि शिक्षण विभागाने मिळून ९७ अधिकारी-कर्मचारी-शिक्षक यांना पदोन्नती दिली आहे. तसेच, २०३ जणांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना आणि वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

यामध्ये प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार आणि पदोन्नती निवड समितीच काम पाहिले. ११ एप्रिल रोजी एकाच दिवशी १२ संवर्गातील ८२ अधिकारी-कर्मचारी यांना पदोन्नती, तर १६ संवर्गातील ७७ जणांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला. शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या नेतृत्वाखाली ६ शिक्षकांना पदोन्नती आणि १२३ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात आली.

# घोडबंदर शिवसृष्टीसाठी वीस कोटींचा निधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**भाईंदर** : ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याजवळ शिवसृष्टी प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी जवळपास २० कोटी रुपये इतका निधी खर्च केला जाणार असून तसा प्रशासकीय ठराव पालिकेने मंजूर केला आहे. यामुळे लवकरच या कामाला सुरुवात केली जाणार आहे. घोडबंदर किल्ल्याच्या जवळ असलेल्या शासकीय ९ एकर जागेत किल्ल्याच्या तटबंदीपासून ३५ मीटर अंतर सोडून हा शिवसृष्टी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित माहिती देणारी वास्तू उभारली जाणार आहे.

हा प्रकल्प उभारण्यासाठी ५४ कोटी रुपये खर्चाचा अहवाल राज्य शासनाला पालिका प्रशासनाकडून सादर करण्यात आला आहे. यास तीन वर्षांपूर्वी मंजुरी देण्यात आली आहे. त्यावरून संपूर्ण प्रकल्प खर्च शासनामार्फत उचलला जाणार आहे. याबाबतचे शासन आदेश ५ सप्टेंबर २०२४ प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

पहिल्या टप्प्यात जवळपास २० कोटी ३२ लाख ५२ हजार रुपये कामाच्या खर्चास मिरा भाईंदर महापालिकेकेकडून प्रशासकीय ठराव करून मंजुरी देण्यात आली आहे. मे बिलीव्ह इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेला या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहे. तर लवकरच हे काम सुरु होणार असून मुंबई उपनगरात पर्यटनाच्या दृष्टीने केंद्रबिंदू ठरणारे पर्यटक स्थळ उभे राहणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# मानखुर्द बालसुधारगृहातून १२ वर्षांचा मुलगा बेपत्ता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** मानखुर्द येथील बालसुधारगृहातील १२ वर्षांचा मुलगा सोमवारी दुपारी ४ च्या सुमारास अचानक गायब झाला. बालसुधारगृहातील कर्मचाऱ्यांनी याप्रकरणी ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस या मुलाचा शोध घेत आहेत. समाजातील अनाथ, वंचित, गतीमंत आणि आई-वडीलांपासून दुरावलेल्या मुलांसाठी मुंबईत आठ बालसुधारगृहे आहेत. मानखुर्द बालसुधारगृहातून सोमवारी दुपारी ४ च्या सुमारास एक मुलगा




बेपत्ता झाला. बालसुधारगृहातील मुलांना दररोज सायंकाळी ४ ते ६ या वेळेत खेळण्यासाठी बाहेर सोडण्यात येते. नेहमीप्रमाणे सोमवारी या मुलांना बाहेर खेळण्यासाठी सोडण्यात आले होते. सायंकाळी ६ वाजता या मुलांची हजेरी घेऊन त्यांना पुन्हा आत घेण्यात आले. यावेळी तीन मुले गायब असल्याचे येथील कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्यांचा शोध घेतला. या दरम्यान दोन मुले सुधारगृहात परतली. मात्र १२ वर्षांचा मुलगा बेपत्ता होता. सोमवारी रात्री उशिरापर्यंत त्याचा शोध घेण्यात येत होता. मात्र तो सापडला नाही. त्यामुळे बालसुधारगृहातील एका सुरक्षा रक्षकाने याबाबत अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानुसार त्यांनी याप्रकरणी ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# नामशेष झालेल्या वनसंपदेमुळे जांभूळ सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : निसर्गाच्या ऋतू बदलानुसार जंगलात पिकणाऱ्या अनेक रानमेव्याची प्रतीक्षा असते. अशाच प्रकारे उन्हाळ्यात येणाऱ्या जांभळाचे आगमन झाले आहे. मात्र या जांभळांना प्रचंड दर आला आहे. जांभूळ सध्या १२० ते १४० रुपये पावकिलो म्हणजे तब्बल ५०० किलो पेक्षा अधिक वर पोहचले आहे. अनेक ठिकाणी जांभूळ हे वाटीच्या मापाने विक्री केली जात आहे. या वाटीच्या मापात ही ५० रुपयांपेक्षा कमी दर नाही.

उन्हाळ्यात साधारणतः आंबा, करवंद, जांभूळसह इतर अनेक प्रकारचे रानमेवे बाजारात येतात. यात करवंद ही वधारली आहेत. त्यामुळे यावर्षी करवंदाच्या वाटीचेही दर चढे आहेत. वाढत्या उन्हाळ्यात या रानमेव्याना मागणी ही असते. साधारणतः २० ते २५ रुपये दरांच्या दरम्यान असलेल्या या रानमेव्यांचा आस्वाद घेतला जात होता. मात्र दरवर्षी रानमेव्याच्या या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिक या स्वादापासून वंचित राहू लागले



आहेत. सध्या विकासाच्या नावाने जंगलावर अतिक्रमण सुरू आहे. यात अनेक वर्षांपासून फळ देणारी खास करून रानमेवा असलेले वृक्षही तोडले जात आहेत. तर दुसरीकडे दगड खाणीच्या स्फोटाचाही यात येथील वाढत्या प्रदूषणाचाही परिणाम झाला आहे. प्रदूषणामुळे फळावर मोठ्या प्रमाणात धूळ साचू लागली आहे. बाजारात आदिवासी आणि राज्य भरातून आलेल्या वेगळया प्रतीच्या व आकाराच्या जांभळांचे आगमन झाले आहे. यात उरणच्या आसपासच्या खेड्यातून आणि जंगलातून आणलेली जांभल शंभर रुपये पावकिलो आणि एपीएमसी मधून आलेली जांभळे १४० रुपये पावकिलोने विक्री केली जात आहेत.

# कर्जदारांचे विलंब शुल्क रद्द करण्याची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे मार्च २०२५ पेड इन एप्रिल चे नियमित वेतन अद्यापही पगार खात्यावर जमा झालेले नाहीत. त्यामुळे पगारदार आर्थिक विवंचनेत आहेत. शिवाय अनेक पगारदारांनी विविध प्रकारची कर्ज काढलेली आहेत. त्यांचे हप्ते ECS द्वारा साधारणपणे १० तारखेपर्यंत वर्ग होत असतात. परंतु १५ दिवस होऊनही माहे मार्च महिन्याचे वेतन अद्यापही जमा झाले नसल्याने सर्व कर्जदारांना कर्ज हप्त्यावर विलंब शुल्क (दंड) भरावे लागणार आहे. सदरचा विलंब होण्यामागे आर्थिक वर्षाच्या क्लोजिंगची अनेक कारणे आहेत. याकरिता ज्यांचे वेतनच विलंबाने जमा होत आहेत त्यांना दंड व्याज न आकारण्याबाबत सर्व बँकांना निर्देश देण्यात यावेत अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस,कोकण विभाग अध्यक्ष रमेश निवृत्ती जाधव, ज्ञानेश्वर गोसावी (कोकण विभाग सचिव,उल्हासनगर महानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र गवळी यांनी उपमुख्यमंत्री अजीत पवार यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## ग्रुप ग्रामपंचायत रायते कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : कल्याण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय रायते व श्री.हनुमान चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त प्रतिमेचे पुजन व अभिवादन करण्यात आले. या वेळी आदर्श सरपंच राज्य पुरस्कार प्राप्त सरपंच समिता सुरोशी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले व माजी सरपंच तथा शिवसैनिक .संतोष सुरोशी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आला.. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी .राजाभाऊ सुरवसे, उपसरपंच मयुर सुरोशी, सदस्य .हरेश पवार, .यतिन बुटेरे, सुभाष जाधव,उमेश दोंदे, कर्मचारी मानसी देसले, मनिषा जाधव, ,नारायण सुरोशी, पंढरीनाथ पवार, जयवंती पवार, बाळाराम तारमळे,पोलिस कॉन्स्टेबल सानप, विकास कांबळे,मिलिंद चंदणे, काळूराम जाधव, भाऊराव क्षेत्री उपस्थित होते व आभार प्रदर्शन युवक काँग्रेस अध्यक्ष अमोल सुरोशी यांनी केले , मोठ्या उत्साहात दिमाखात हा कार्यक्रम संपन्न झाला.!

## शारदा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या विद्यार्थ्यांची करांटे स्पर्धेत धवल कामगिरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वासिंद : मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी ठाणे आयोजित राज्य स्तरीय कराटे स्पर्धेत येथील शारदा इंग्लिश मिडीयम स्कुल वासिंदच्या विद्यार्थ्यांनी धवल कामगिरी केली आहे.

भाटिया हॉल, कोपरी ठाणे येथे पार पडलेल्या या स्पर्धेत येथील शारदा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील धृती हालके इयत्ता 6 वी हिने 12 वर्ष वयोगटामध्ये सुवर्ण पदक मिळविले. इयत्ता 5 वी मधील जय हिवाळे व मित पाटील यांनी 12 वर्ष वयोगटामध्ये ब्रॉझ पदक मिळविले. तर 16 वर्षं वयोगटात इयत्ता दहावीतील पूर्वा माने हिने कांस्य पदक व हंशिका बिडवी हिने सुवर्ण पदक मिळवून शाळेचे नाव लौकिक केले आहे.

या सर्व विद्यार्थी व क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) दौलत चव्हाण यांचे विद्या विकास मंडळाचे चेअरमन विठ्ठल सातवी, सचिव रविंद्र शेलार, संचालक मंडळ व शाळेचे प्राचार्य प्रशांत जाधव, पर्यवेक्षिका राधिका निक्ते, पर्यवेक्षिका नुपूर रोठे यांनी आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर यांनी अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## अभिनेत्री करुणा कातखडे यांचा पाणी वाटप उपक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी पाण्यासाठी चवदार तळ्यावर सत्याग्रह केला पाणी हे जीवन आहे पाणी सर्वांना मिळाला पाहिजे याच पवित्र उद्देशाने मी गेली पाच वर्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यानासमोर मिनरल पाण्याचे वाटप करत आहे पाणी हे जीवन आहे याचा मला खूप आनंद होत आहे बाबासाहेबांचा वारसा व स्वप्न सत्यात आणण्याचे समाधान मला मिळत आहे असे स्पष्ट प्रतिपादन नामावंत सिने अभिनेत्री समाजसेविका करूणा कातखडे यांनी केले. त्या पाणी वितरण प्रसंगी प्रसार माध्यमांशी बोलत होत्या.

यावेळी पाणी वितरणाचे उद्घाटन आरपीआयचे राष्ट्रीय सचिव दयाल बहादुरे यांनी केले. सहकार्य करणारे सिने अभिनेत्री करुणा कातखडे यांचे पती समाजसेवक दिलीप कातखडे, चिरंजीव ऋषिकेश कातखडे स्वतः पाणी वितरण करत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष हेमंत यादगिरे, पुरोगामी विचार मंचचे बंडू घोडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जनसेवेचा दीपस्तंभ दीपक वानखेडे, ममता वानखडे, प्रमोद जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माता भगिनी व जनतेने पाणी पिण्यासाठी प्रचंड गर्दी केली. याबद्दल सिने अभिनेत्री करूणा कातखडे व परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुख्यमंत्री कृती कार्यक्रमांतर्गत आदिवासी भागात सौरऊर्जेचा प्रभावी उपयोग - जिल्हाधिकारी किशन जावळे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
रायगड : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 100 दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत आदिवासी भागातील शेतीला बळ देण्यासाठी एक अभिनव उपक्रम रायगड जिल्ह्यात यशस्वीरीत्या राबवण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत सुमारे 400 एकर क्षेत्रावर शेती करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना पोर्टेबल सोलार पंपचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या शेतकऱ्यांना आज प्रतिनिधिक स्वरूपात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते या पोर्टेबल पंपचे हस्तातरण करण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात आमुलाग्र बदल घडून येण्यास चालना मिळेल असा विश्वास जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी व्यक्त केला.

सुमारे 40 दिवसांपूर्वी जिल्हाधिकारीश्री जावळे यांनी रोहा तालुक्यातील किल्ला या गावाला भेट दिली असता, आदिवासी शेतकरी सलग 400 एकर क्षेत्रावर दोडका, कारली, भेंडी, कलिंगड यांसारख्या निर्यातक्षम भाजीपाला पिकांची शेती करत असल्याचे निदर्शनास आले. मात्र, ही शेती डिझेल पंपांच्या माध्यमातून सिंचन केली जात होती. 45 डिझेल पंपांच्या वापरामुळे एका हंगामात सुमारे 65 लाख रुपयांचे डिझेल खर्च होत होते, आणि वर्षातून दोन हंगामांमध्ये हा खर्च तब्बल 1 कोटी 30 लाख रुपयांपर्यंत जात होता. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत होते. शेती फायदेशीर करण्यासाठी या खर्चात बदल करण्यासाठी आणि ही स्थिती बदलण्यासाठी सोलार पंप लावण्यचे विचार करण्यात आला. मात्र, जमिनीचे मालक वेगळे आणि शेतकरी वेगळे असल्यामुळे पारंपरिक सोलार पंप बसवणे शक्य नव्हते. यावर उपाय म्हणून 'पोर्टेबल आणि मुव्हेबल सोलार पंप सेट' तयार करण्याची संकल्पना मांडण्यात आली. सोलार क्षेत्रात काम करणारे अभिजित धर्माधिकारी यांच्या मदतीने हा अभिनव सोलार सेट डिझाइन करण्यात आला, जो ट्रॅक्टरच्या सहाय्याने एका शेतातून दुसऱ्या शेतात नेला जाऊ शकतो.

सध्या या पोर्टेबल सोलार पंप सेटची यशस्वी चाचणी पार पडली असून, त्यामधून पाच एचपी क्षमतेने पाणी पंपिंग करण्यात येत आहे. लवकरच अशा आणखी सोलार पंप उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांचे डिझेलवरील अवलंबित्व कमी होऊन सुमारे 1.30 कोटी रुपयांची वार्षिक बचत होणार आहे.

या उपक्रमामुळे केवळ आर्थिक बचतच नव्हे, तर प्रदूषणही मोठ्या प्रमाणावर टाळता येणार आहे. सौरऊर्जेचा वापर करून पर्यावरणपूरक शेतीस चालना मिळणार आहे. हा प्रकल्प जिल्ह्यातील पहिलाच आणि आदिवासी शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी ठरणारा आहे.

हा प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या "सामान्य माणसासाठी, खालच्या थरातल्या माणसासाठी काहीतरी नाविन्यपूर्ण करावं" या दृष्टिकोनातून साकारलेला आहे. या योजनेमुळे आदिवासी बांधवांना साधनं मिळून त्यांचं उत्पादन वाढेल आणि शेवटी देशही संपन्न होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी जावळे यांनी व्यक्त केला आहे. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे, प्रांत ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख,कृषी अधिकारी महादेव करे, मकरंद बरटक्के शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पडघ्यात महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा येथे संयुक्त जयंती महोत्सव २५ गावे पडघे विभागाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली.

१४ एप्रिल रोजी पडघा जिल्हा परिषद शाळा प्रांगणात संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले.तर कार्यक्रमाचे उद्घाटन शिवराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड रोशन पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नाथा जाधव , श्रीधर जाधव,पडघा ग्रामपंचायत सरपंच रवींद्र विशे , माजी सरपंच शैलेश बिडवी, उपसभापती गुरुनाथ जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.पडघा हे ऐतिहासिक गाव आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पडघ्यात आले होते.त्या आठवणींना उजाळा मिलिंद जाधव यांनी आपल्या प्रास्तविकेतून मांडला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर एका जातीधर्माचे नसून सर्वांचे आहेत.डॉ. बाबासाहेबांचे विचार सर्वांनीं आत्मसात करायला हवेत तरच चळवळ अधिक गतिमान होईल. आपल्यापासून इतिहास लपवला गेला असून सत्य इतिहास शोधा. महामनवांचे विचार सर्वजण एकत्र येऊन घराघरा पर्यंत पोहचवूया असे यावेळी व्याख्याते ॲड रोशन पाटील यांनी मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. यावेळी भिवंडी मनपाचे उपायुक्त शैलेश दोंदे, म.रा.मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर अशोक शेरेकर, ग्रा. सदस्य शुध्दोधन जाधव, शैलेश बिडवी, ज्येष्ठ कवी सुनील पाटील, माजी सरपंच पराग पाटोळे, शंशाक तांबोळी ग्रा.सदस्य योगेश पाटील आदी उपस्थित होते. यावेळी पडघा विभागातील सामाजिक कार्यकर्ते, पडघा पोलिस स्टेशन, सरपंच, सदस्य,पोलिस पाटील व सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांना क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव २५ गावे पडघे विभागाच्या वतीने भारतीय संविधानाची प्रास्ताविका फ्रेम देउन सन्मानित करण्यात आले. तर सायंकाळी समतानगर ते पडघा जिल्हा परिषद शाळेपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या पुतळयाला पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मिरवणूकीची सुरुवात करण्यात आली. तर यावेळी नृत्य प्रशिक्षक रोहित पवार यांच्या मार्गर्शनाखाली "ब्रीड्स ब्रेकर्स" डान्स स्टुडिओ पडघा येथील मुलांनी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.मिरवणुकीत पडघा विभागातील विविध क्षेत्रातील नागरिक पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागातील मिलिंद जाधव, सुरज भालेराव, विशाल सोष्टे, मयूर सोष्टे, सागर जाधव, यश कांबळे,राकेश जाधव , विशाल चव्हाण, अजय सोष्टे, वैभव सोष्टे, रोहित सोष्टे, आदेश जाधव ,दिनेश सोष्टे ,अनिकेत सोनावणे, शुभम भोईर या तरुणांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

## वाढदिवसाच्या शुभेच्छा म्हणून विद्यार्थ्यांना वह्या द्या!



### आ. निरंजन डावखरे यांचे समर्थकांना आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : शालेय उन्हाळी सुट्टी येत्या २ दिवसापासून सुरू होतील. मुल आनंदाने नाचू लागतील, सर्व विद्याथीर् उत्तीर्ण होऊन पुढील वर्गात जातील, वर्ग नवा, शिक्षक नवे, कपडे नवे, वह्या - पुस्तकं नवी, पट्टी-पेन्सिल, पेन सर्व काही नवे. या गोष्टी विद्याथ्र्यांना शाळा जुनमध्ये सुरू झाल्यानंतर मिळणाऱ्या. पण जर एखाद्याच्या वाढदिवशी शालेय सुट्टीपूर्वीच मिळाल्यातर... हा पुढचा विचार केला आहे कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी. आमदार निरंजन डावखरे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त मला शुभेच्छा म्हणून पुष्पगुच्छ आणण्यापेक्षा गोरगरीब विद्याथ्र्यांना शैक्षणिक मदतीसाठी शालेयपयोगी वस्तू आणा, त्या गोरगरीबांना द्या, असे आवाहन केले होते. त्या पार्श्वभुमीवर मंगळवार दि १५ एप्रिल रोजी कोकण पदवीदर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा झाला. दिलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय ठाणे यांच्याकडून विद्याथ्र्यांना वहया देण्यात आल्या. वेळेआधीच वह्यांचा मिळाल्याने विद्याथ्र्यांचा आनंद द्विगुणीत झाला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन मोरे, ठाकूर कॉलेजचे अध्यक्ष मंगेश ठाकूर , प्राचार्य संतोष गावडे, प्रा संभाजी शेळके,एकनाथ पवळे आदि शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## कल्याण पूर्वमध्ये महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी स्वाक्षरी मोहिम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी स्वाक्षरी मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेचा उद्देश बोधगया महाविहार कायदा १९४९ रद्द करावे, महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्याची मागणी आहे. या मोहिमेची सुरुवात सूर्या शाळेजवळील रत्न सागर बुद्ध विहारमधील तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना हार अर्पण करून करण्यात आली. सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ते रुपेश हुंबरे यांच्या पुढाकारातून स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.

या उपक्रमाला सर्व स्तरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विभागातील बहुसंख्य महिला, पुरुष आणि विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी करून या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. या स्वाक्षरी मोहिमेत वंचित बहुजन महिला आघाडीचे ठाणे जिल्हा अध्यक्ष माया कांबळे, निलम तांबे, शितल तांबे, कल्याण पूर्व युवा आघाडी अध्यक्ष प्रकाश घोंगडे, प्रफुल्ल साळवे, गणेश शिंदे, देवानंद कांबळे, विक्रांत इंगळे, डी.एम. गायकवाड, अनिल खरात, भारतीय बौद्ध महासभेचे विठ्ठल मस्के, अशोक हुंबरे आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# तळा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /बोरघर : दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा आणि बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा व उपशाखा तळा यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती महोत्सव सोमवार, दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी मु.मेकडे सभागृह डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी संपन्न झाला.

याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी सकाळी १०.३० वा गणपत जगताप यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्याचप्रमाणे तळा तालुका संरक्षण प्रमुख व सैनिक मनोहर शिंदे व संपूर्ण समता सैनिक दलाच्या संचलनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयभीमच्या जयघोषात मानवंदना देण्यात आली, याप्रसंगी आंबेडकर चौक या ठीकाणी तळा नगरपंचायतचे सर्व नगरसेवक व नगरसेविका यांची प्रमुख उपस्थिती होती,त्याचप्रमाणे भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांचे मान्यवर पदाधिकारी व भीम अनुयायी उपस्थित होते. तदनंतर मेकडे सभागृह या ठिकाणी नरेश मोरे, अनिश येलवे, जे के गायकवाड व विशाखा शिंदे यांच्या माध्यामातून सामुदायिकरित्या त्रिसरण पंचशील व सूत्रपठण करण्यात आले. त्याचप्रमाणे उपस्थित सर्व मान्यवर व पदाधिकारी यांचा स्वागत समारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय बौद्धमहासभा तालुका तळा अध्यक्ष रामदास राघो शिंदे यांनी केले. याप्रसंगी सभेच्या ठिकाणी महिला व बालकल्याण मंत्री आदीती तटकरे यांनी या जयंतीसाठी हजेरी लावून भीम अनुयायांना शुभेच्छा दिल्या त्याचप्रमाणे विचारमंचावरील मान्यवरांनी उपस्थित भीम अनुयायांसाठी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले यामध्ये संबोधी जाधव, संदेश पवार, तळा नगरपंचायत उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, जेष्ठ समाजसेवक सदानंद येलवे आदी मान्यवरांनी आपली शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी प्रमुख प्रबोधन मार्गदर्शक राष्ट्रीय महासचिव मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ मा.गोरखनाथ वेताळ यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढ्याचा व क्रांतीचा प्रदीर्घ इतिहास व आजची आपली निर्माण झालेली स्थिती यावर मूलभूत आशा विषयांची मांडणी करून भीम अनुयायांना प्रबोधित केले, त्यानंतर अध्यक्षीय भाषणाने जयंती महोत्सव सभेची सांगता करण्यात आली, याप्रसंगी आभारप्रदर्शन प्रा.सचिन गवाणे व आदित्य शिंदे यांनी केले, तदनंतर स्नेह भोजन झाले व जयंती मिरवणुकीस सुरूवात झाली,भीमानुयायांनी खालूबाजा या पारंपारिक वाद्याच्या तालावर लेझीम व डीजे डॉल्बीच्या तालावर नाचून जयंतीचा जल्लोष व्यक्त केला,मेकडे सभागृहापासून निघालेल्या मिरवणुकीचा समारोप तळा नगरपंचायत या ठिकाणी करण्यात आला,या जयंतीच्या सभेप्रसंगी तळा तहसीलदार स्वाती पाटील, तळा पोलीस ठाणे पोलीस उपनिरीक्षक सतीश गवई व सर्व पोलीस कर्मचारी, तळा पंचायत समिती गटविकास अधिकारी लक्ष्मण शिंदे, सामाजिक कार्यकर्ते ॲड.उत्तम जाधव, माजी महिला व बालकल्याण सभापती जिल्हा परिषद गीता जाधव,पत्रकार विश्वास गायकवाड,ॲड.संघराज गायकवाड,ॲड.प्रबुद्ध माळी,ॲड. सुशांत जगताप,डॉ.सिद्धार्थ जगताप,डॉ.आदेश घोणे, किरण अडखळे,अर्चना तांबे, सुषमा शिंदे,मनीषा गायकवाड, निकिता गायकवाड आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. या जयंतीसाठी पंचशील विकास संस्था तळा, बामसेफ संघटना तळा यांनी सहकार्याची भूमिका निभावली, या जयंती प्रसंगी भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा पुरुष व महिला पदाधिकारी, बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा व उपशाखा पुरुष व महिला पदाधिकारी यांची उपस्थिती होती त्याचप्रमाणे हजारो भीम अनुयायांच्या उपस्थित १३४ वा जयंती महोत्सव पार पडला.या संपूर्ण जयंती महोत्सवाचे सूत्रसंचालन सुरेंद्र शेलार यांनी केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. Chemistry Maths, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. Chemistry, M.Com. Advanced Accountancy, M.A. Marathi, M.A. History, M.A. Economics, M.A. Sociology, M.A. Geography, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024